UGC Approved Journal
Sr. No. 64310

ISSN 2319-8648

Indexed (IIJIF)

Impact Factor - 2.143

# Current Global Reviewer

UGC Approved International Refereed Research Journal Registered & Recognized
Higher Education For All Subjects & All Languages

Editor in Chief
Mr.Arun B. Godam

www.rjournals.co.in

**Half Yearly** Nov. 2017-Apr. 2018 | **UGC Approved** | **ISSN : 2319 - 8648**
Issue X Vol II, Jan. 2018 | **Sr. No. 64310** | **Impact Factor : 2.143**


| | | | |
|---|---|---|---|
| 16 | महिलांचा आर्थिक विकास आणि उद्योजकता | डॉ.सतीश बाबुराव डोंगे | 70 |
| 17 | ॲरिस्टॉटलच्या 'नैतिक सदगुण' संकल्पनेचा अन्वयार्थ | पंडगे संतोष रमेशराव | 74 |
| 18 | ग्रामीण साहित्य संकल्पना व स्वरूप | प्रा. डॉ. हनुमंत तुकाराम माने | 77 |
| 19 | विद्यार्थ्यांच्या सृजनशीलतेचा विकासासाठी कार्यक्रमनिर्मितीचा अभ्यास | प्रा.मरेवाड पी.पी. | 81 |
| 20 | स्त्री उत्थानातील डॉ.बाबासाहेब आंबेडकराच्या कार्य व चळवळीचे योगदान | डॉ.पी.जी. राठोड | 86 |
| 21 | नव्वदोत्तरी स्त्रीवादी कथालेखनातील स्त्रीजीवन | प्रा.डॉ.लक्ष्मण ना.वाघमारे | 89 |
| 22 | 'अण्णा भाऊ साठे यांच्या साहीत्यातील आंबेडकरी विचार' | डॉ. आर. एस. पारवे | 92 |
| 23 | पश्चिम महाराष्ट्र का लिगांयत समाज : एक अध्ययन | डॉ. लक्षटे रत्नाकर बाबुराव | 97 |
| 24 | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे लढे आणि साहित्य निर्मिती | डॉ. शिवाजी जवळगेकर | 100 |
| 25 | योगदर्शनातील मानसशास्त्र | प्रा. भुसारे जी.एन. | 103 |

**CURRENT GLOBAL REVIEWER**

...ly Nov. 2017-Apr. 2018 | UGC Approved | ISSN : 2319 - 8648

... II , Jan. 2018 | Sr. No. 64310 | Impact Factor : 2.143

# डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे लढे आणि साहित्य निर्मिती

**डॉ. शिवाजी जवळगेकर**

दयानंद कला महाविद्यालय, लातूर.

-----------------(24)-----------------

प्रगत भारताचे लोकशिक्षक डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी परंपरानिष्ठ मूल्यव्यवस्थेविरूद्ध नवमूल्यात्मक मांडणीसाठी लोकशिक्षण, लोकलढे, लोक आंदोलने, लोकचवळवळी, लोकप्रबोधनासाठी 'बहिष्कृत भारत' आणि 'मूकनायका' तून आपली जी तत्त्वज्ञानात्मक भूमिका निर्भिडपणे आणि प्रेरणात्मक पद्धतीने मांडल्यामुळेच वाङ्मय निर्मिती होऊ शकली. दलित वाङ्मय हा भारतीय पातळीवर अनेक संदर्भीय इतिहास आहे. विश्वभूषण डॉ. बाबासाहेब आंबेडकर या नावाचा धार्मिक, आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय, नैतिक, तत्त्वज्ञानात्मक, मानसशास्त्रीय, तर्कशास्त्रीय, नितीशास्त्रीय, कायदेशास्त्रीय, संख्याशास्त्रीय, वैद्यकशास्त्रीय, शिक्षणशास्त्रीय, मानववंशशास्त्रीय, सांस्कृतिक मानववंशशास्त्रीय असा सर्वव्यापक सर्व शास्त्रांचा सर्वसमावेशक आणि सर्व संदर्भीय इतिहास असल्यामुळेच १९२० पासून लेखन करणाऱ्या सर्वच लेखकांची प्रेरणा ही डॉ. बाबासाहेब आंबेडकर आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या पुढील लढ्याच्या प्रेरणेने वाङ्मयनिर्मिती झाली आहे.

१. काळाराम मंदीर प्रवेश लढा
२. महाडचा चवदार तळ्याचा सत्याग्रह
३. मनुस्मृती दहन
४. येवल्याची धर्मांतराची ऐतिहासिक जाहीर घोषणा
५. गोलमेज परिषदेतील सत्यनिष्ठ भूमिका
६. पिपल्स एज्युकेशन सोसायटीची स्थापना
७. भारतीय संविधान निर्मिती
८. हिंदूकोड बिल मंजूर न झाल्याबद्दल कायदेमंत्रीपदाचा दिलेला राजीनामा
९. पुणे करार
१०. महापरिनिर्वाण

महापुरुषाच्या आयुष्यातील या दहा घटनांमुळे भारतीय समाज संपूर्णपणे ढवळून निघाला. प्रत्येक प्रसंग, प्रत्येक घटना ऐतिहासिक आणि नवसमाज निर्मितीपूरक असल्यामुळेच भारतीय भाषातील कवी, कथाकार, कादंबरीकार, नाटककार, चरित्रकार, आत्मचरित्रकार, आत्मकथनात्मक लेखन करणारे लेखक, वैचारिक लेखन करणारे लेखक, प्रासंगिक लेखन करणारे लेखक, गीतकार, समीक्षक, संपादक आणि प्रकाशकांची उर्जा म्हणजे प्रज्ञासूर्य डॉ. भीमराव रामजी आंबेडकर नावाचे महावादळ होय. भारताच्या इतिहासातील एकमेव नाव असून या नावाने भारताचा इतिहास आणि भूगोल बदलला. या सर्वक्षेत्रीय बदलाचे परिणाम भारतीय समाज व्यवस्थेतील प्रत्येक प्रवर्गावर झाले. अंतर्बाह्यदृष्ट्या बदलाची गतीस्थिती वाढल्यामुळेच ? परंपरावादी मूल्यव्यवस्था परिवर्तनवादी मूल्यव्यवस्था असा अविरत संघर्ष कार्यरत झाला. या आत्मशोधात्मक संघर्षानेच प्रश्न निर्माण केले. आम्ही कोण आहोत ? आमचे शोषण कोणी केले ? धर्मशास्त्रांना एवढे अधिकार कोणी दिले होते ? धर्म, धर्मशास्त्री की अन्वयार्थक मोठे ? सर्व समान का नाहीत ? समान होणारच नाहीत का ? समानतेचे सूत्र हे लोक स्विकारणारच नाहीत का ?. अशा असंख्य प्रश्नांच्या उत्तराच्या शोधात निघालेले वाङ्मय सेवक हे केवळ शब्दबंबाळाचे धनी नव्हते.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रत्येक लढ्याच्या केंद्रस्थानी अस्पृश्य, दलित 'माणूस' होता. हा उपेक्षित, दुर्लक्षीत, शोषित, गुलाम, अशिक्षित, परंतु बंडखोर माणूस हा सर्वांच्या साहित्याचा केंद्रबिंदू होता. हा माणूसच डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या लढ्याचा कणखर साथीदार होता. क्रांतिकारी योद्धा होता. आणि इतिहासाचा नायकही होता. म्हणूनच बाबासाहेबांनी निष्ठावान माणसांची एक बलदंड फळी तयार करून जुन्या व्यवस्थेला त्र्यंबक सपकाळेंच्या भाषेत 'सुरुंग' लावण्याचे कार्य केले. नामदेव ढसाळांनी परंपरानिष्ठ काव्यलेखन संकेत समूळ नाकारून मुक्तछंदात कविता लिहिली. मराठीतील अस्सल शिव्यांच्या नोंदीने काव्यशास्त्रालाच घाम फुटला. विद्रोही कवी बाबुराव बागुलांनी

Half Yearly Nov. 2017-Apr. 2018
Issue X Vol II, Jan. 2018
CURRENT GLOBAL REVIEWER
UGC Approved Sr. No. 64310
ISSN : 2319 - 8648
Impact Factor : 2.143

प्रयोगशाळा म्हणजेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर होय. या प्रयोगशाळेमुळेच सामाजिक बांधिलकीतून प्रज्ञावंत ले कलावंतांची पिढी घडली आहे.

**निष्कर्ष :**

१. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे व्यक्तिमत्त्व म्हणजे शतकांनाही ओलांडून प्रभावित करणारे होते.
२. मांडलेले तत्त्वज्ञान परंपरेविरुद्ध आणि समाजहितार्थ असल्यामुळेच चर्चा आणि चिंतन चालू आहे.
३. व्यक्तिमत्त्व आणि तत्त्वज्ञानाच्या प्रेरणेतून वाङ्मय निर्मात्यांनी स्वतंत्र भूमिकानिष्ठ निर्मिती केली.
४. सर्वच वाङ्मयप्रकारातून चळवळ, इतिहास, तत्त्वज्ञान आणि समाज चित्रित झाला आहे.
५. मराठी वाङ्मयविश्व समृद्ध करण्यासाठी व नोंदीसाठी निर्मिती केली.
६. सर्वच शास्त्रांना नवदृष्टीकोणात्मक कक्षा विस्ताराचे बळ मिळाले.
७. भाषिकदृष्ट्या स्वतंत्र अभ्यास करण्यास प्रेरक कार्य ठरले.
८. नवपिढीस प्रेरक, स्वतंत्र निर्मितीपूरक कार्य केले.